उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत जिल्हा व तालुकास्तरावरील पदांचा सुधारीत संस्थीय संरचना आराखडा मंजूर करणेबाबत...

## उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

५ वा मजला, दक्षिण बाजू सिडको भवन सीबीडी,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
एमएसआरएलएम/प्र.क्र.८६९/२०१८
दिनांक - ०५/०४/२०१८

### कार्यालयीन परिपत्रक २९४

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्रमांक एमएसआरएलएम २०१२/प्र.क्र. ४२ /योजना ३ ग्रामविकास विभाग, दि. ३१/०३/२०१२
२) शासन निर्णय क्रमांक मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३/योजना ३ ग्रामविकास विभाग, दि. २१/०५/२०१३
३) दिनांक १९/०५/२०१७ रोजी संपन्न उच्चस्तरीय समिती बैठक
४) शासन निर्णय क्रमांक मजिअ २०१७/प.क्र.५९/योजना-३ दिनांक ७/०७/२०१७
५) राज्यस्तरीय कार्यकारी समिती सभा दिनांक २६ मार्च २०१८

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सद्यस्थितीत २६ जिल्हे व २५४ तालुक्यात इन्टेन्सिव्ह पध्दतीने तर उर्वरित तालुक्यांमध्ये सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पध्दतीने कामकरण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक २, ३ व ४ अन्वये इन्टेन्सिव्ह जिल्ह्यात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुक अभियान व्यवस्थापन कक्षाचा संस्थीय संरचना आरखडा मंजूर करण्यात आलेला आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आस्तित्वातील मंजूर पदांच्या कार्तव्ये व जबाबदा-यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. यासाठी संदर्भ क्रमांक ५ अन्वये संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कार्यकारी समितीने विषय क्रमांक ६ (ब) अन्वये जिल्हा व तालुकास्तरीय संस्थीय संरचना सुधारीत करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार इन्टेन्सिव्ह जिल्ह्यासाठी खालील प्रमाणे सुधारीत संस्थीय संरचना मंजूर करण्यात येत आहे.

### अ) जिल्हास्तरावरील सुधारीत संस्थीय संरचना

**I. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व व्यवस्थापक**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक
२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियान सहसंचालक
३. **जिल्हा अभियान व्यवस्थापक** (सदर पदावरील कार्यरत व्यवस्थापक हे जिल्हा अभियान व्यवस्थापक त्याबरोबरच जिल्हा व्यवस्थापक - उपजीविका (कृषी), जिल्हा व्यवस्थापक - उपजीविका बिगर कृषी या पदांचे काम पाहतील)
४. **जिल्हा व्यवस्थापक - आर्थिक समावेशन, रोजगार व कौशल्य विकास** (या पदावरील कार्यरत व्यवस्थापक हे जिल्हा व्यवस्थापक - आर्थिक समावेशन व जिल्हा व्यवस्थापक - रोजगार व कौशल्य विकास या पदांचे काम पाहतील)
५. **जिल्हा व्यवस्थापक - सामाजिक समावेशन, संस्थीय बांधणी व क्षमता बांधणी** (सदरील पदावर कार्यरत व्यवस्थापक हे जिल्हा व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी आणि जिल्हा व्यवस्थापक - क्षमता बांधणी या पदांचे काम पाहतील)

६. **जिल्हा व्यवस्थापक MIS and M &E** (सदरील पदावर कार्यरत व्यवस्थापक हे जिल्हा व्यवस्थापक MIS व जिल्हा व्यवस्थापक - M&E या पदांचे काम पाहातील)

७. **जिल्हा व्यवस्थापक - विपणन व ज्ञान व्यवस्थापन** (सदरील पदावर कार्यरत व्यवस्थापक हे जिल्हा व्यवस्थापक - विपणन व जिल्हा व्यवस्थापक - ज्ञान व्यवस्थापन या पदांचे काम पाहातील)

८. **कार्यालयीन अधिक्षक तथा जिल्हा व्यवस्थापक - संपादणूक** (प्रशासन, मनुष्यबळ व संपादणूक विषयक संपर्ण कामे पाहातील)

९. **लेखाधिकारी** (ज्या ठिकाणी अभियानामार्फ़त लेखाधिकारी नेमण्यात आलेले आहेत त्या ठिकाणी ते काम करतील सदरील पद रिक्त असणा-या पदाचा कार्यभार लेखाधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना कार्यभार देण्यात यावा.)

II. **जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील सहाय्यक कर्मचारी**

१. लेखापाल
२. प्रशासन सहाय्यक
३. डेटा एन्ट्री ऑपरेटर
४. शिपाई

## ब) तालुकास्तरीय सुधारीत संस्थीय संरचना

I. **तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व व्यवस्थापक**

१. **तालुका अभियान व्यवस्थापक** (सदर पदावरील कार्यरत व्यवस्थापक हे तालुका अभियान व्यवस्थापक त्याचबरोबर तालुका व्यवस्थापक - उपजीविका या पदांचे काम पाहतील)

२. **तालुका व्यवस्थापक - सामाजिक समावेशन, संस्थीय बांधणी व क्षमता बांधणी** (सदरील पदावर कार्यरत व्यवस्थापक हे तालुका व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी आणि तालुका व्यवस्थापक - क्षमता बांधणी या पदांचे काम पाहतील)

३. **तालुका व्यवस्थापक MIS and M &E** (सदरील पदावर कार्यरत व्यवस्थापक MIS व M&E या विषयक काम पाहातील)

४. **तालुका व्यवस्थापक - आर्थिक समावेशन** (या पदावरील व्यक्ती तालुका व्यवस्थापक - आर्थिक समावेशन व रोजगार व कौशल्य विकास विषयक पाहतील)

II. **तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील सहाय्यक कर्मचारी**

१. प्रशासन व लेखा सहाय्यक
२. डेटा एन्ट्री ऑपरेटर
३. शिपाई

वरील प्रमाणे सुधारीत संस्थीय संरचनेनुसार निश्चित पदे आस्तित्वात राहातील तर जादा होणा-या पदावरील कार्यरत व्यवस्थापक व सहाय्यक कर्मचारी यांना इतर पदावर समावून घेतल्या जाईल. त्याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

5/4/2018

आर. विमला, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**माहितीस्तव प्रत,**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. उपसचिव (योजना) ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव अरग्रेषित

**हितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी प्रत**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियाना संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर, भंडारा, अमरावती, अकोला, हिंगोली, धुळे, वाशिम, नाशिक, जळगाव, नांदेड, परभणी, लातुर व बुलढाणा यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियाना सहसंचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर, भंडारा, अमरावती, अकोला, हिंगोली, धुळे, वाशिम, नाशिक, जळगाव, नांदेड, परभणी, लातुर व बुलढाणा यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३. जिल्हा अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

४. श्री / श्रीमती ----------------------------------------, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

५. जिल्हा समन्वय अधिकारी (सर्व), राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव

६. लेखा शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई

७. प्रशासन शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई

८. मनुष्यबळ शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई